**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**ग्राहक तक्रार निवारण मंच**

**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.१८/२०१५-१६/१५६ दिनांक: ९/११/२०१५

**आदेश केस क्र.१८/२०१५-२०१६**

१) श्री.राजेंद्र ईश्वरा भोरे, — अर्जदार
पलूस कॉलनी, पलूस,
ता.पलूस, जि.सांगली.

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता, — विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, विटा

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, पलूस

**कोरम:-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. राजेद्र ईश्वरा भोरे रा. पलूस कॉलनी, पलूस जि. सांगली यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्याय निवारणीसाठी मंचाकडे **अ** फॉर्म मध्ये तक्रार दाखल केली असून संबंधीत अधिका-यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

## <u>पूर्वपिठीका</u>

श्री. ईश्वर आनंदा भोरे ग्राहक क्रमांक २८१७२०८११७१४ हे मयत असून त्यांचा मुलगा राजेंद्र ईश्वरा भोरे यांनी दि. ३१.७.२०१५ रोजी **क्ष** फॉर्ममध्ये तक्रार दाखल करुन आपल्यावर झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी केली होती. त्याचा निकाल दि.३१.०८.२०१५ रोजी ८५२४ या क्रमांकाने सांगली अंतर्गत कक्ष, महावितरण यांनी दिला असून त्याचा आशय खालीलप्रमाणे तत्कालीन शाखा अभियंता, किर्लोस्करवाडी यांनी अर्जदाराचा अर्ज नसताना श्री बाळासाहेब आनंदराव भोरे यांच्या अर्जानुसार श्री ईश्वरा आनंदा भोरे यांच्या नावे असलेले क्र.२८१७२०८११७१४ हे कनेक्शन का बंद केले (कायमस्वरुपी याचा उलगड होत नाही) तसेच शाखा अभियंता, किर्लोस्करवाडी यांनी पत्र क्र.१०५ दि.१६.०३.२०१३ या पत्रामध्ये सदर कनेक्शनचा पीडीसी अहवाल दिलेला असून या अहवालामध्ये ग्राहकाचे नांव श्री ईश्वरा आनंदा भोरे ऐवजी श्री बाळासाहेब आनंदराव भोरे असे का दिले याचा उलगडा होत नाही. सबब कार्यकारी अभियंता, विटा यांनी अर्जदारास संयुक्तिक उत्तर देवून समाधान करावे असे म्हटले आहे. हा आदेश मान्य नसलेचे ग्राहकाने अ फॉर्ममध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली या आदेशाप्रमाणे कार्यकारी अभियंता, विटा यांनी ग्राहकाबरोबर काही पत्रव्यवहार केलेला मंचाकडे सादर केलेला नाही. (ग्राहकास काहीही माहिती दिलेली दिसून येत नाही. (सदर सुनावणी दरम्यान महावितरणचे अधिकारी त्रयस्थ/व्यक्तीस ज्यांचे नांव श्री बाळासाो आनंदा भोरे असे समजले यांना घेवून आले होते, हे लक्षात आल्याबरोबर त्यास मंचाने आक्षेप घेवून ही कृती अयोग्य असल्याचे अधिका-यांना सुनावले). वरील आदेश मान्य नसलेचे ग्राहकांने क्ष फॉर्ममध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली दि.१.५.२०१५ रोजी.

## ग्राहकाची मागणी

अर्जदार श्री राजेंद्र ईश्वरा भोरे यांनी आपल्या वडीलांचे नांवे त्यांच्या वापरात असलेले कनेक्शन म.रा.वि.वि.कं. अधिकाऱ्यांनी चुकीच्या पध्दतीने कायमस्वरुपी बंद केले आहे. तरी संबंधित कर्मचा-यावर / व्यक्तिवर कायदेशिर कारवाई करणेबाबत मंचाकडे तक्रार केली आहे. आपल्या सविस्तर अर्जात त्यांनी खालील मुद्दे मांडले आहेत.

१. १९६७ मध्ये वडीलांच्या नांवावर ग्राहक २८१७२०८११७१४ हे कनेक्शन त्यांच्या वहिवाटीच्या गट नं.२११५ घरगुती वापराचे कन्‌क्शन घेतले होते व ते दि.१५.०३.२०१३ अखेर त्यांच्याचा नांवे होते.

२. श्री ईश्वरा आनंदा भोरे यांच्या नांवे येणारे वीज बिल श्री राजेंद्र ईश्वरा भोरे हे भरत होते. कोणतेही बिल थकविलेले नाही.

३. वडीलांच्या नांवे असणाऱ्या कनेक्शनशी चुलते श्री बाळासाहेब आनंदा भोरे यांचा कोणताही संबंध नाही.

४. श्री बाळासाहेब भोरे यांनी श्री ईश्वरा भोरे यांच्या निधनानंतर त्याची जागा हडप करण्यासाठी महावितरणकडे सदर कर्नेक्शन बंद करण्यासाठी अर्ज केला.

५. या कालावधीत महावितरण, किर्लोस्करवाडी येथे कार्यरत असणारे अधिकारी श्री शहाजी केशव चव्हाण व श्री बाळासाहेब आनंदा भोरे यांनी संगनमताने बेकायदेशिर रित्या हे कनेक्शन बदललेले आहे. सदर कारवाई १६.०३.२०१३ रोजी केली आहे.

६.	दि.१६. ०३.२०१३ रोजीच्या कार्यालयीन अहवालात श्री बाळासाहेब आनंदा भोरे यांच्या नांवे असणारी ग्राहक २८१७२०८११७१४१४ हे कनेक्शन कायमस्वरुपी बंद केलेचे नमूद केले आहे.

७.	ही सर्व माहिती सविस्तर स्वरुपात अर्जदार श्री भोरे व त्यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले. कोणतीही थकबाकी नसताना माझी वीज जोडणी बेकायदेशिरपणे संबंधित अधिकाऱ्यांनी अन्यायीरित्या बंद केली असून संबंधितावर नियमानुसार कारवाई व्हावी अशी मागणी केली.

यावर उत्तर देताना उपस्थित अधिकारी यांनी श्री भोरे यांचे म्हणणे कागदपत्राप्रमाणे बरोबर असल्याचे मान्य केले आणि ही घटना आमच्या कार्यकालावधीत झालेली नाही असे सांगितले. विषेश म्हणजे **

अर्जदारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे माहिती अधिकाराखाली मागविलेली आहे.व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कोणतीच लेखी माहिती मंचास सादर केलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे. ग्राहकाने संबंधितावर कायदेशिर कारवाई करावी ही मागणी केली.

मंचासमोर आलेल्या कागदपत्रावरील माहिती, अर्जदारांनी सांगितलेली माहिती, अधिकाऱ्यांचे निवेदने यावरुन खालील मुदे उपस्थित होतात.

१.	सदर कनेकशन बेकायदेशीरपणे बंद केले आहे का?
	होय.

२.	संबंधीत अधिका-यावर कार्यवाही करता येईल का?
	होय, नियमाप्रमाणे कारवाई होऊ शकते.

३.	आदेश.
	अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारण मिमांसा

महावितरणच्या संबंधीत अधिका-यांनी सदर कनेकशन बंद करतांना कोणत्याच कायदेशीर बाबीचा आधार घेतलेला दिसत नाही. सर्वसाधारणपणे जर

१.	लाईट बिल नियमाप्रमाणे वेळेत भरले नाही.

२.	बेकायदेशीरपणे लाईटचा वापर केला.

३.	महावितरणच्या वीज वापराच्या नियमाचा भंग केला.

४.	ग्राहकाने स्वतः अगर मयत ग्राहकाच्या कायदेशीर अधिकृत वारसाने कनेकशन बंदचा अर्ज केला.

अशापैकी एखादे अगर अनेक कायदेशीर कारणे घडली असली तरी वीज पुरवठा खंडीत करायचा नियमाना अधीन राहून विज पुरवठा बंद करण्याची पध्दत आहे तशी नोटीसही ग्राहकास दयावी अशी पध्दत आहे, पण यापैकी कोणतेच कारण कृती घडल्याचे दिसून येत नाही.

अर्जदार यांनी मागितलेली माहितीनुसार उत्तर देतांना उपकार्य.अभियंता महावितरण पलूस यांनी ग्रा.क्र. २८१७२०८११७१४/४ हे वीज कनेकशन श्री. बाळासाहेब आनंदराव भोरे यांच्या नावावर नसून भोरे ईश्वरा आनंदा यांच्या नावावर आहे असे म्हटंले आहे आणि ते श्री. बाळासाहेब आनंदा भोरे यांनी दिलेल्या अर्जानुसार अंतिम वीज देयक भरल्यानंतर दि.१६.३.१३ रोजी बंद केले आहे असे म्हंटले आहे. पीडीसी अहवालावर श्री. बाळासाहेब आनंदा भोरे यांचे नांव नोंद केलेले आहे

त्यावर कनिष्ठ अभियंता महावितरण किर्लोस्करवाडी यांची सही व शिक्का असलेचे सादर प्रतीवर दिसून येते,सबब प्रश्न क्र.१ चे उत्तर होय असे आहे.ग्राहकाची कोणतीच चूक नसतांना अनधिकृत अर्जानुसार अधिकृत ग्राहकावर अन्याय करुन महावितरणचे रेकॉर्ड चुकीच्या पध्दतीने व चुकीचे रंगविणे ही बाब योग्य नाही. मंचाने

वीज कनेकशन बंद करुन महावितरण अधिका- यांनी नुकसान केली आहेसर्व प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला असता यांनी नुकसान केली आहेसर्व प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला असता अर्जदार यांचे म्हणणे पूर्णपणे योग्य असलेचे दिसून येते. सबब

१. ग्राहकावर अन्याय करणे.

२. महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान करणे.

३. खोटी कागदपत्रे तयार करणे.

अशा प्रकारची इतर संयुक्तीक कारणे विचारात घेऊन संबंधीत कर्मचा-यावर दि. ३१.१२.१५ पूर्वी महावितरणच्या अंतर्गत योग्य ती कारवाई नियमाप्रमाणे सुरु करुन मंचास तसे अवगत करावे आणि ग्राहकावरील अन्याय दूर करावा.

मंचाच्या अधिनियम २००६ मंचाच्या उदेशामध्ये स्पष्टपणे मंच ग्राहकाच्या हिताचे रक्षण करणे असे म्हटलेले आहे कलम ८.२ मधील कलम ५ मध्ये म्हटल्याप्रमाणे इतर कोणताही आदेश जो प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता उचित मानला गेला आहे त्यानुसार कारवाई व्हावी असे मंचाचे मत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यांत येत आहे.

२. संबंधीत कर्मैचा-यावर कारवाई व्हावी.

३. सदर अर्जदाराची तक्रार-

मंचाच्या अधिनियम २००६ मंचाच्या उदेशामध्ये स्पष्टपणे मंच ग्राहकाच्या हिताचे रक्षण करे असे म्हटलेले आहे कलम ८.२ मधील कलम ५ मध्ये म्हटल्याप्रमाणे इतर कोणताही आदेश जो प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता उचित मानला गेला आहे त्यानुसार कारवाई व्हावी असे मंचाचे मत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ९/११/२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.